**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी**
मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :–

**माझे नाव** : **नवनाथ विनायक खांडेकर**,
वय : ४० वर्षे, व्यवसाय : ड्रायव्हर,
राहणार : सुकटा गांव, ता.भुम, जि.धाराशिव.

**शपथेवर सरतपास अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री.डी.एल. वाडेकर :**

दि.२४/०६/२०२४ रोजी मला नगर तालुका पोलीसांनी साईराम धाबा, नगर–सोलापुर येथे पंचनाम्यासाठी पंच म्हणुन दुपारी ०४.०० वाजता बोलावले होते. त्यावेळी तेथे दुसरे पंच म्हणुन नाना सर्जेराव मदने हे देखील हजर होते. त्यावेळी फिर्यादी यांनी आम्हाला अपघात झाल्याचे घटनास्थळ दाखविले. घटनास्थळाच्या पुर्वेला साईराम धाबा होता. पश्चिमेला चौपदरी रस्त्याचा डिव्हाईडर, दक्षिणे व उत्तरेला नगर–सोलापुर रस्ता असे दिसून आले. त्यावेळी पोलीसांनी माझे सांगण्यानुसार घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला दि.२४/०६/२०२४ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११** देण्यात येते.

**शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे त्यांचे वकील श्री.एम.के. शेडाळे :**

२. ज्यावेळी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनाम्याकामी थांबविले होते त्यावेळी मी माझी गाडी घेवुन सोलापुरला चाललो होतो व थोडया वेळासाठी साईडला थांबलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पंचनाम्यामध्ये काय लिहिले होते हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांच्या सांगण्यावरून मी पंचनाम्यावर सही केली होती. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, पोलीस मला म्हणाले की अपघात झाला आहे यावर सही करा म्हणुन मी सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, तेथे काय अपघात झाला याबाबत मला माहिती नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला मजकुर खोटा व चुकीचा

आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

SACHIN RAJARAM SHINDE

Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.07.17 17:50:54 +0530

**(एस.आर. शिंदे)**

**दि.१७/०७/२०२५**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२०, अहमदनगर.